पुण्य नगरी

# ७ वर्षांनी रुग्णाला लागली निवांत झोप!

**मुंबई** : मुंबईतील लीलावती रुग्णालयात मित्र क्लिप प्रक्रियेद्वारे घेतलेल्या उपचारानंतर रुग्ण सात वर्षांनंतर पहिल्यांदा ७ तास झोपू शकला आहे. या आजारामुळे रुग्णाला श्वास घ्यायला त्रास होत असल्याने ते झोपू शकत नव्हते; पण या उपचारांमुळे रुग्णाला नवीन आयुष्य मिळाले आहे.

गोपाल (७७) यांना श्वास घेताना त्रास होत असल्याने ते झोपू शकत नव्हते. तासन्तास खुर्चीवर बसून राहायचे. गेली सात वर्ष हे असेच सुरू होते. मिट्रल व्हॉल्व्ह रेगर्गिटशन या हृदयाच्या आजाराबद्दल लोकांमध्ये जागरूकतेचा अभाव असल्याने जगभरात या आजाराचे प्रमाण वाढत आहे. ही समस्या जागतिक लोकसंख्येच्या २ टक्केपेक्षा जास्त लोकांना प्रभावित करते आणि व्यक्तीच्या वयानुसार अधिक त्रासदायक ठरते.

डॉ. रविंदर सिंग राव म्हणाले की, वैद्यकीय तपासणीत या व्यक्तीच्या हृदयातील व्हॉल्व्हमध्ये बिघाड असल्याचे निदान झाले. मिट्रल व्हॉल्व्ह रेगर्गिटशन या आजारात हृदयाकडून शरीराकडे जाणाऱ्या रक्त प्रवाहात अधिक प्रयत्न करावे लागतात. वेळीच उपचार न झाल्यास हृदयाचे स्नायू कमकुवत होऊ शकतात. प्रसंगी हार्ट फेल्युअरचा धोका वाढू शकतो. या रुग्णाच्या प्रकरणात कॅथेटर मांडीतून घालण्यात आला आणि हृदयाच्या उजव्या बाजूपासून डाव्या बाजूला नेव्हिगेट केला गेला. त्यानंतर एक क्लिप घातली गेली. या प्रक्रियेमुळे फुफ्फुसातील दाब यशस्वीरीत्या कमी झाला. शस्त्रक्रियेनंतर या रुग्णाला एक दिवस आयसीयूमध्ये डॉक्टरांच्या देखरेखीखाली ठेवण्यात आले होते. त्यानंतर प्रकृतीत सुधारणा पाहून तिसऱ्या दिवशी त्यांना डिस्जार्च देण्यात आला. पूर्वी ते रात्री झोपू शकत नव्हते. मात्र, आता शस्त्रक्रियेनंतर सात वर्षांनी ते आता झोपू शकले. इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. रविंदर सिंग राव यांच्या नेतृत्वाखाली डॉ. आनंद राव, डॉ. विद्या सुर्तकल आणि डॉ. नम्रता कोठारी या डॉक्टरांच्या टीमने या व्यक्तीवर यशस्वी मिट्राक्लिप प्रक्रिया केली आहे.

Smart Mumbai Edition
Aug 7, 2023 Page No. 1
Powered by : eReleGo.com